# Tata Power's Club Enerji organizes Awareness Drive to address water pollution in Mumbai

Publication : Punya Nagari

Edition : Mumbai

Page No : 1

Date : 02nd December 2015

Headline : Awareness campaign on Mumbai’s water pollution : Tata Power club Enerji initiative



## मुंबईच्या जलप्रदूषणाबाबत जनजागृती मोहीम

**टाटा पॉवर क्लब एनर्जीचा उपक्रम**

**मुंबई :** टाटा पॉवर या खाजगी वीज निर्मिती व वितरण करणाऱ्या कंपनीने क्लब एनर्जी या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून राबविलेल्या मोहिमेत मुंबईमध्ये जलप्रदूषणाबाबत जनजागृती मोहीम नुकतीच राबविली. गेटवे ऑफ इंडिया येथे राबविण्यात आलेल्या या मोहिमेत वाढत्या जलप्रदूषणामुळे जनतेच्या जीविताला धोका निर्माण झाल्याबद्दल सामाजिक जागृती करण्यात आली. ७ ते ८ वर्षांच्या ९० विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ९०० हून अधिक सर्वसामान्यांना जलप्रदूषणाबाबत शहाणे केले. पथनाट्याबरोबरच गेटवे ऑफ इंडियाभोवती नौकेतून कठपुतळ्यांच्या देखावा करण्यात आला होता. पाणी प्रदूषण आणि त्यामुळे आरोग्याला घातक होणारे वातावरण याबाबत अधिकाधिक जनजागृती व्हावी, देशाचे सामाजिक जबाबदार नागरिक होण्यासाठी मुलांना प्रोत्साहन मिळावे, असा या उपक्रमामागचा उद्देश होता. याबाबत टाटा पॉवरचे एमडी व सीईओ अनिल सरदाना यांनी शतक महोत्सवी वर्षानिमित्त नैसर्गिक स्त्रोतांच्या संवर्धनाबाबत जागृती निर्माण करण्याचे धोरण स्वीकारल्याचे स्पष्ट केले. जलप्रदूषण ही चिंतेची बाब असून गेटवे ऑफ इंडिया येथील क्लब एनर्जी विद्यार्थ्यांच्या पथनाट्यातून नागरिक आपली जबाबदारी ओळखतील आणि ते कमी करण्यासाठी प्रयत्न करतील, अशी अपेक्षा सरदाना यांनी व्यक्त केली आहे. क्लब एनर्जीच्या माध्यमातून देशभरातील हजारो विद्यार्थी वीज बचत, नैसर्गिक स्त्रोत संवर्धनाच्या उपक्रमात सहभागी झाले आहेत.

Publication : Tarun Bharat

Edition : Mumbai

Page No : 2

Date : 01st December 2015

Headline : Awareness Drive to address water pollution



थोडक्यात महत्त्वाचे

## जलप्रदूषणाबाबत जनजागृती मोहीम संपन्न

**माहीम :** क्लब एनर्जी ही टाटा पॉवरची राष्ट्रीय स्तरावरील जनजागृती चळवळ असून या अंतर्गत गेट-वे-ऑफ इंडिया येथे जलप्रदुषणाबाबत नुकताच जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ७ ते ८ वयोगटातील सुमारे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. या मोहिमेंतर्गत पथनाट्य सादर करण्यात आले. यानंतर गेट वे ऑफ इंडिया भोवती नौकेतून कठपुतळ्यांचा देखावा साकारण्यात आला. जल प्रदूषण आणि त्यामुळे आरोग्याला घातक होणारे वातावरण याविषयी जास्तीत जास्त जनतेपर्यंत जनजागृती व्हावी, देशाचे एक सामाजिक जबाबदार नागरिक होण्यासाठी मुलांना प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. जल प्रदूषण ही एक चिंतेची बाब असून आम्ही आयोजित केलेल्या जनजागृती मोहिमेतून नागरिक आपली जबाबदारी ओळखतील आणि ते कमी करण्यासाठी प्रयत्न करतील, अशी अपेक्षा टाटा पॉवरचे एमडी आणि सीईओ अनिल सरदाना यांनी व्यक्त केली.

Publication: Afternoon
Edition: Mumbai
Page No: 16
Date: 2nd December 2015
Headline: Tata Power Club Enerji Awareness Program at Gateway of India




Approximately 90 students from Tata Power's Club Enerji aged 7-8 years participated in an awareness programme at the Gateway of India sensitizing around 900 people about the dangers posed to public health due to the increasing rate of water pollution in the city recently. The drive included a street play performance, followed by a puppet show on a ferry around the Gateway of India. The objective of this initiative was to educate the public at large about the risks associated with water pollution and the consequent health hazards it poses, along with encouraging children to become socially responsible citizens of the country.

Publication : The Asian Age
Edition : Mumbai
Page No : 3
Date : 29th November 2015
Headline : Drive over water pollution



Anil Sardana

# Drive over water pollution

**Mumbai:** Club Enerji, Tata Power's nationwide movement, orgainsed on Saturday an awareness drive at the Gateway of India about the dangers posed to public health due to increasing rate of water pollution in the city. Approximately 90 students aged 7-8 years participated in the awareness programme sensitising 900 people. The drive included a street play performance, followed by a puppet show on a ferry around the Gateway of India. Speaking on this initiative, Anil Sardana, MD & CEO, Tata Power, said, "Water Pollution has become an area for concern and through this drive we hope people understand their social responsibilities."

Publication : Lokmat
Edition : Mumbai
Page No : 3
Date : 30th November 2015
Headline : Awareness Drive to address water pollution

# जलप्रदूषणाबाबत जनजागृती मोहीम

मुंबई : ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न चिघळला असतानाच जलप्रदूषणाच्या समस्येनेही नागरिक हैराण झाले आहेत. परिणामी, पाणी प्रदूषित होऊ नये आणि प्रदूषित पाण्यापासून आरोग्याला पोहोचणाऱ्या संभाव्य धोक्यासह जलप्रदूषणाबाबत मुंबईत जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे.

शहरातील वाढत्या जलप्रदूषणामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत आहे. परिणामी, सामाजिक जनजागृतीच्या माध्यमातून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे. याबाबत नुकतेच गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या जनजागृती कार्यक्रमात ७-८ वर्षांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. शिवाय विद्यार्थ्यांसह ९०० अधिक नागरिकही जनजागृती मोहिमेत सहभागी झाले होते. या वेळी पथनाट्यातून पाण्याचे महत्त्व विशद करण्यात आले. शिवाय गेट वे ऑफ इंडिया सभोवताली कठपुतळ्यांचा देखावा सादर करण्यात आला. आणि पाणी प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांविषयीही उपस्थितांना माहिती देण्यात आली.

नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन करणे आणि नागरी मूल्यांचे जतन करणे, हा यामागचा उद्देश असल्याचे मोहिमेचे आयोजक टाटा पॉवर क्लब एनर्जीच्या वतीने सांगण्यात आले. (प्रतिनिधी)